## अमरावती महानगरपालिका ,अमरावती
## दिनांक १२.१.२०२४ रोजीचा प्राप्त प्रशासकीय विषय
(प्रशासकीय विषय)

**विषय क्रमांक १५३ -** **अमरावती महानगरपालिकेच्या वर्ग 'अ','ब', व 'क'नमूद एकुण 280 नवनिर्मीत पदांना निर्माण करण्यास तसेच काही पदे व्यपगत करण्यास व सुधारीत आकृतीबंधास मा.सर्वसाधरण सभेची मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्रमांक १५३ -** अमरावती महानगरपालिका हे या शहराचे नियोजन प्राधिकरण असून सन 2011 जनगनणा नुसार शहराची लोक संख्या 6,47,057 लक्ष होती. कोविड-2019 ची महामारी परिस्थिती उद्भवल्यामुळे सन 2021 ची जनगनणा होऊ शकली नाही. परंतू अमरावती शहराची सद्य:स्थितीत लोकसंख्या सुमारे 9 लक्ष पेक्षा जास्त आहे. अमरावती शहरामधील सातत्याने वाढणारी लोकसंख्या झपाट्याने होणारे नागरीकरण, त्यामुळे पायाभुत सुविधावर पडणारा ताण, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना, या सर्व योजनेवर योग्य रितीने अंमलबजावणी करीता व शहरातील नागरीकांना तत्परतेने सेवा पुरविण्याकरीता नवनिर्मीत पदे निर्माण करणे आवश्यक आहे. म्हणून खालील प्रमाणे वर्ग निहाय 'अ', 'ब', व 'क' नमूद एकुण 280 नवनिर्मीत पदांना निर्माण करण्याकरीता प्रशासकीय टिपणी मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस सादर करण्यात येत आहे.

**वर्ग-अ**

| अ.क्र. | वर्ग | नवनिर्मित पदाचे नाव | नवनिर्मित पदाची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | वर्ग-अ | उपायुक्त | 02 |
| 2. | वर्ग-अ | उपअभियंता (स्थापत्य) | 03 |
| 3. | वर्ग-अ | वैद्यकीय अधिकारी | 02 |
| 4. | वर्ग-अ | स्त्री रोग तज्ञ | 01 |
| 5. | वर्ग-अ | बाल रोग तज्ञ | 01 |
| 6. | वर्ग-अ | मुख्य संगणक अधिकारी | 01 |
| 7. | वर्ग-अ | मुख्य विधी अधिकारी | 01 |
| 8. | वर्ग-अ | मुख्य स्वच्छता अधिकारी | 01 |
| | | **एकुण पद संख्या** | **12** |

## वर्ग-ब

| अ.क्र. | वर्ग | नवनिर्मित पदाचे नाव | नवनिर्मित पदाची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | वर्ग-ब | सहाय्यक आयुक्त | 04 |
| 2. | वर्ग-ब | उप शिक्षणाधिकारी | 01 |
| 3. | वर्ग-ब | सहाय्यक पर्यावरण संवर्धन अधिकारी | 01 |
| 4. | वर्ग-ब | लघुलेखक(निवडश्रेणी) | 01 |
| 5. | वर्ग-ब | उपमुख्य स्वच्छता अधिकारी | 02 |
| 6. | वर्ग-ब | सहाय्यक अभियंता (यांत्रिकी) | 01 |
| 7. | वर्ग-ब | मालमत्ता व्यवस्थापन अधिकारी | 01 |
| | | एकुण पद संख्या | 11 |

## वर्ग-क

| अ.क्र. | वर्ग | नवनिर्मित पदाचे नाव | नवनिर्मित पदाची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | वर्ग-क | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 13 |
| 2. | वर्ग-क | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | 02 |
| 3. | वर्ग-क | अधिक्षक | 03 |
| 4. | वर्ग-क | लेखापाल | 01 |
| 5. | वर्ग-क | सहा.अधिक्षक | 05 |
| 6. | वर्ग-क | वरीष्ठ लिपीक /निरीक्षक | 20 |
| 7. | वर्ग-क | कनिष्ठ लिपीक | 30 |
| 8. | वर्ग-क | लघुलेखक (निम्मश्रेणी) | 01 |
| 9. | वर्ग-क | लघु टंकलेखक | 03 |
| 10. | वर्ग-क | सिस्टीम ॲनालिस्ट | 01 |
| 11. | वर्ग-क | सहाय्यक अतिक्रमण पथक प्रमुख | 02 |
| 12. | वर्ग-क | सहाय्यक आरेखक | 02 |
| 13. | वर्ग-क | शाळा निरीक्षक | 02 |
| 14. | वर्ग-क | उद्यानिरीक्षक | 03 |
| 15. | वर्ग-क | पशुधन निरीक्षक | 01 |
| 16. | वर्ग-क | एक्स रे टेक्नीशिएन (क्ष-किरण तंत्रज्ञ) | 01 |
| 17. | वर्ग-क | सार्वजनिक आरोग्य परीचारीका | 05 |

| | | | |
|---|---|---|---|
| **18.** | वर्ग-क | सहाय्यक परीचारीका प्रसविका | 10 |
| **19.** | वर्ग-क | बहुउदेशिय आरोग्य सेवक | 05 |
| **20.** | वर्ग-क | ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक | 04 |
| **21.** | वर्ग-क | स्वास्थ निरीक्षक | 06 |
| **22.** | वर्ग-क | अग्निशमन केंद्र अधिकारी | 08 |
| **23.** | वर्ग-क | उपअग्निशमन केंद्र अधिकारी | 08 |
| **24.** | वर्ग-क | लिडींग फायरमन | 21 |
| **25.** | वर्ग-क | फायरमन | 100 |
| | | **एकुण पद संख्या** | **257** |

महानगरपालिका अमरावती तत्कालीन प्रशासक यानी वेळोवेळी मंजूरी केलेली सरळसेवेची पदे महानरगरपालिकेचा आस्थापना खर्च उत्पन्नाच्या मर्यादेपेक्षा जादा असल्यामुळे तसेच त्या पदांची नियमित स्वरुपात कामकाजाच्या दृष्टीने आवश्यकात भासत नसल्यामुळे ती पदे व्यपगत करुन त्या पदासाठी आवश्यकता भासल्यास बाहय यंत्रेमार्फत सेवा उपलब्ध करुन घेतल्या जाऊ शकते या कारणास्तव असे सर्व गट-ब ते गट-ड मधील एकुण 650 पदे व्यपगत करुन त्या ऐवजी सद्य:स्थितीत आवश्यकता असणारी गट-अ ते गट-क मधील एकुण 280 नवनिर्मीत पदे मंजूरीबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. ही पदे नवनिर्मीत असले तरी तत्कालानी प्रशासक यांच्या ठरावान्वये मंजूर पदे व्यपगत करण्यात येत असल्यामुळे जादा आर्थीक आस्थापना खर्चावर भार येत नाही.

त्याचप्रमाणे यापुर्वी शासन स्तरावरुन व तत्कालीन प्रशासक यांनी वेळोवळी ठरावान्वये मंजूर केलेली पदे तसेच नवनिर्मीत पदांचा असे एकुण 2087 पदांचा सुधारीत आकृतीबंध शासनास मंजूरीसाठी सादर करणेकरीता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता आहे. करीता सदर प्रशासकीय विषय मा.प्रशासकांची यांचे मंजूरीकरीता सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेत मंजरीस्तव सादर करण्यात आला आहे.परंतु सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान.

**स्वा./-**
**नगर सचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.